दि. १५/१२/२०२१

# प्राध्यापकांसाठी महत्वाची सुचना

## “शैक्षणिक वर्ष २०२१—२२ मधील हिवाळी परीक्षेच्या आयोजनाबाबत”

प्रथम वर्ष कला आणि वाणिज्य सत्र १ परीक्षा जानेवारी २०२२ मध्ये पूर्ण करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. दि. १३ डिसेंबर, २०२१ रोजी संचालक (परीक्षा व मुल्यमापन विभाग, मुंबई विद्यापीठ) यांनी पाठविलेल्या परिपत्रक क्रमांक Exam/DBoEE/ICC/2021-22/18 मधील निर्देशानुसार महाविद्यालयांना सत्र १ (नियमित) ची परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घ्यावयाची असून ती परीक्षा घेण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबी खाली देत आहे. त्यानुसार आपण कार्यवाही करून परीक्षा यथोचित पार पाडण्यासाठी आपले योगदान अत्यंत महत्वपूर्ण असणार आहे. आपल्याला दिलेली जबाबदारी अचूक, दिलेल्या वेळेत, दिलेल्या निर्देशाप्रमाणे करणे आवश्यक आहे. त्याबाबी खालीलप्रमाणे

१. मुंबई विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाने ठरवून दिलेल्या नियम व अटींचे पालन करून परीक्षेसाठी आवश्यक असलेल्या बहुपर्यायी प्रश्नावलीचा संच (Question Bank) विद्यार्थ्यांना तात्काळ उपलब्ध करून द्यावा.

२. Cluster / Lead महाविद्यालयांनी घेतलेल्या निर्णयानुसार Google Form मधून परीक्षा आयोजित करावयाची आहे. त्यानुसार बहूपर्यायी प्रश्नपत्रिका ऑनलाईन स्वरूपामध्ये तयार करावी.

३. पारंपारीक अभ्यासक्रमांच्या (कला, वाणिज्य व विज्ञान) पदवी पदव्युत्तर परीक्षेसाठी ५० गुणांची ऑनलाईन बहुपर्यायी थेअरी परीक्षा घेण्यात यावी. यात ५० बहुपर्यायी (MCQ Type) प्रश्न देण्यात यावेत व सदर परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना १ तास वेळ देण्यात येणार आहे.

४. सदर परीक्षेसाठी आवश्यक प्रश्नपत्रिकेतील ५० बहुपर्यायी (MCQ Type) प्रश्नात हिवाळी सत्र २०२०—२१ मधील प्रश्नांची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता संबंधित विषय शिक्षकांनी घ्यावी.

५. सत्र १ (नियमित) परीक्षेसाठी आवश्यक असलेल्या प्रश्नपत्रिकेचे ३ संच संगणकीकृत स्वरूपामध्ये महाविद्यालय परीक्षा विभागाकडे दि. २४ डिसेंबर, २०२१ पर्यंत सादर करावे.

६. सत्र १ (नियमित) परीक्षा दि. १३ जानेवारी, २०२२ ते दि. २० जानेवारी, २०२२ या कालावधीत घेण्यात येणार आहेत.

७. Practical, Project, Viva-Voce परीक्षा प्रत्येक महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयातील शिक्षकांच्या सहाय्याने ऑनलाईन पद्धतीने (Zoom App., Google Meet, Skype इत्यादी मिटींग ॲप्स) किंवा आवश्यकतेनुसार दुरध्वनीव्दारे मौखिक परीक्षा दि. ०२ जानेवारी, २०२२ पासून घेण्यात याव्यात. मौखिक परीक्षा घेण्यासाठी प्रश्नसंच तयार करण्यात यावेत. विद्यार्थ्यांच्या परीक्षेतील उपस्थिती बाबत नोंदी ठेवण्यात याव्यात. सदर परीक्षांचे गुण हे MKCL पोर्टलवर किंवा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर परीक्षेनुसार त्वरीत अपलोड करण्यात यावेत.

८. ज्या अभ्यासक्रमांना अंतर्गत परीक्षा (Internal Exam / Term work) आहेत त्या अभ्यासक्रमांच्या गुणांच्या नोंदी महाविद्यालयांनी ऑनलाईन दि. १३ जानेवारी, २०२२ च्या आत सदर गुणांच्या नोंदी कराव्यात.

९. परीक्षा विभागाने सर्व Google Form मधल्या लिंक सॉफ्ट कॉपी व हार्ड कॉपी मध्ये संबंधित विषय शिक्षकांकडून जमा करून घ्याव्या.

१०. परीक्षा विभागाने तयार केलेले वेळापत्रक आपणास दि. ३१ डिसेंबर, २०२१ रोजी उपलब्ध केले जाईल. त्यानुसार सर्व संबंधित विषय शिक्षकांनी दिलेली जबाबदारी विषयानुसार प्रत्येक दिवशी पार पाडावयाची असून यामध्ये कोणत्याही प्रकारची हलगर्जी अथवा निष्काळजीपणा चालणार नाही याची नोंद घ्यावी.

११. IT विभागाने लवकरात लवकर विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करून विद्यार्थ्यांना ऑनलाईन परीक्षा घेण्यासाठी कोणकोणत्या अडचणी भेडसावत आहेत त्याचा अहवाल घ्यावा. त्यासाठी पर्यायी साधने उपलब्ध करून देण्यासाठी काय करावे लागेल याचा अहवाल द्यावा.

**डॉ. अतुल साळुंके**
**प्राचार्य**